# 'भीमक्रांती' पुरस्कार पवार-पाटील यांना प्रदान

म. टा. वृत्तसेवा, कुडित्रे

एस. के. डिगे फाउंडेशन, कोल्हापूरच्या वतीने यावर्षी सदानंद डिगे व शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी आमदार संपतराव पवार- पाटील यांना 'समाजरत्न भीमक्रांती' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

फाउंडेशनतर्फे पवार यांच्यासह आमदार सुजित मिणचेकर, प्राचार्य डॉ. हरीश भालेराव, डॉ. रेशमा पवार, रंगराव पाटील, रफीक काझी, दादासाहेब खोत यांनाही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी सदानंद डिगे होते.

यावेळी प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, ' शाहू, फुले, आंबेडकर यांनी समतेची बिजे रोवून आपल्या आचरणातून मानवता हाच धर्म असल्याचे दाखवून दिले. त्यांच्या विचारांची जपणूक करणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जागतिक स्तरावर पोहोचविण्याचे काम कोल्हापूरने केले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा विचार सर्वांनी जपला पाहिजे.'

कार्यक्रमास मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, भरत कुडित्रेकर, धोंडिराम कांबळे उपस्थित होते. डी. के. कांबळे यांनी प्रास्ताविक केले.

# तंत्रज्ञान शाखेमधील संधी

डॉ. रश्मी देशमुख/चेतन आवटी

**सध्याचं युग हे मोबाइल, कम्प्युटर आणि इलेक्ट्रॉनिक्स साधनांचं आहे. त्यामुळे ह्या गोष्टी न हाताळता येणारा माणूस सर्वच बाबतीत मागे पडतो. मोबाइल क्रांतीमुळे सर्वसामान्य माणूसही या इलेक्ट्रॉनिक्सच्या जगात किती सहजपणे मिसळला गेला हे आपण पाहतोच. त्यामुळे निश्चितच संगणक शास्त्रातील अभियांत्रिकी शिक्षणाचा पर्याय हा उत्तम आहे. या शाखेकडे जाण्याचा विद्यार्थ्यांचा कल या कारणानेच वाढत चालला आहे.**



संगणकशास्त्र अभियांत्रिकी ही शाखा मूलतः सांख्यिकी तर्कशास्त्रावर आधारित आहे. सुरुवातीला बेसिक थेअरी, कॉम्प्युटेशन, ऑपरेटिंग सिस्टिम व सिस्टिम प्रोग्रामिंगचे ज्ञान दिले जाते, भविष्यात करिअरमध्ये उपयोगी पडेल असे अद्यावत संगणक भाषा व प्रोग्रामिंगचे सखोल मार्गदर्शन केले जाते. केवळ थेअरीपेक्षा एक्सप्रीमेंटेशनवर भर दिल्यामुळे मुलांचे प्रोग्रामिंग स्कील वाढते, तसेच लॉजिक डेव्हलोपमेंटही होते.

संगणकशास्त्र अभियांत्रिकीतील पदवी घेतल्यानंतर विद्यार्थ्याला बरेच मार्ग खुले राहतात. पहिला आणि सर्वांच्या पसंतीचा मार्ग म्हणजे आयटी कंपनीत नोकरी. चारही वर्षांत विद्यार्थी अभ्यासक्रमात अग्रेसर असेल व कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवडला गेला असेल तर त्याला नोकरीची सुवर्णसंधी तत्काळ उपलब्ध होते. जे विद्यार्थी कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सिलेक्ट होत नाहीत, त्यांनी हताश होण्याची गरज नसते. ॲप्टिट्यूड टेस्टचा सराव व प्रोग्रामिंग स्कील वाढवले तर ऑफ कॅम्पसमध्ये चांगल्या कंपनीत निवड होऊ शकते. दुसरा पर्याय म्हणजे प्रोग्रामिंग स्कील चांगले असेल तर स्वतःच आंत्रप्युनर बनू शकता. सुरुवातीला छोटे प्रोजेक्ट घेऊन देखील स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकता. अभियांत्रिकीतील पदवीनंतर अनेक क्षेत्रात संधी उपलब्ध असतात. फक्त आलेल्या संधीचा योग्यरितीने उपयोग केला पाहिजे. बी.इ./ बी.टेक. नंतर पदव्युत्तर पदवीची संधी उपलब्ध असते. ज्यामध्ये एम.ई./एम.टेक.पासून ते परदेशात एम.एस. करू शकता. याबरोबरच एम.बी.ए. करण्याचा पर्यायही उपलब्ध असतो.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरमधील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये वरील अभ्यासक्रमाच्या संधी उपलब्ध आहेत. यामध्ये एम. टेक. (संगणक शास्त्र आणि तंत्रज्ञान) २००६ पासून व बी.टेक. (संगणकशास्त्र आणि तंत्रज्ञान) २००८ पासून सुरू आहे. येथे आयआयटी मुंबईसोबत असलेल्या एमओयू (शैक्षणिक करार) अंतर्गत स्पोकन ट्युटोरिअलचे वर्कशॉप घेतले जातात. या कार्यशाळेतून आयआयटीमधील तसेच तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून ओपन सोर्स सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना घेता येते. ऑनलाइन टेस्ट पास झाल्यानंतर आयआयटीचे मान्यताप्राप्त सर्टिफिकेटही विद्यार्थ्यांना मिळते. सी.प्लस, प्लस, लेटेक, लिबरे ऑफिस, पायथॉन, मायएसक्यूल, जावा इत्यादी कार्यशाळा तंत्रज्ञान विभागात होतात.

तंत्रज्ञान अधिविभागात संगणक अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमात तिसऱ्या वर्षापासून सेमिनार, मिनी प्रोजेक्टचा समावेश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास, त्याचे सादरीकरण व त्याचा वापर करून समाजोपयोगी संगणक प्रणाली तयार करण्याची संधी मिळते. सध्याच्या काळाची गरज ओळखून अधिविभागाने आयओटीची (INTERNET OF THINGS) अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध केली आहे. त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना अनुभवी तज्ज्ञांकडून मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित केली होती. शिवाजी विद्यापीठाने एसडब्ल्यूएवाएमअंतर्गत MOOC (MASSIVELY OPEN ONLINE COURSE) कोर्सेस विद्यार्थ्यांना उपलब्ध केले आहेत. त्यामधून बरेच विद्यार्थी एनपीटीईएलच्या (NATIONAL PROGRAMME ON TECHNOLOGY ENHANCED LEARNING) माध्यमातून प्रत्येक सेमिस्टरमध्ये सर्टिफिकेशन करतात. त्याचा वापर संगणकातील अत्याधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी होतो. याबरोबरच विद्यार्थ्यांना सर्वांगिण व्यक्तिमत्व विकासासाठी ऑडिट कोर्सेस अभ्यासक्रमात समाविष्ठ केले आहेत.

तंत्रज्ञान अधिविभागात TEQIP अंतर्गत MHRD चे अर्थसहाय्य आहे. त्या योजनेमुळे अनेक विद्यार्थ्यांना आयआयटी, एनआयटीसारख्या देशांतील प्रमुख औद्योगिक संस्थांमध्ये कार्यशाळा, पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट कॉम्पिटिशन मध्ये भाग घेण्याची संधी मिळते.विद्यार्थी तसेच प्राध्यापक उत्कृष्ट दर्जाच्या कार्यशाळांमध्ये सहभागी होतात GATE, GRE, TOFEL सारख्या स्पर्धा परीक्षांचे अर्थसहाय्यही मिळते. ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंटसाठी आवश्यक SKILL PROGRAMMES विद्यार्थ्यांना मोफत करता येतात. अधिविभागातून संगणकशास्त्र आणि तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेले विद्यार्थी टीसीएस, इन्फोसिस, एल. ॲंड टी., सिंटिलसारख्या नामवंत मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये रुजू आहेत. काही विद्यार्थी परदेशात एम. एस. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत.

(लेखक शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीत कार्यरत आहेत.)

# विवेकानंद, डांगे कॉलेज प्रथम

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लेखनकौशल्याला वाव देण्यासाठी घेण्यात आलेल्या महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत विवेकानंद कॉलेज व आण्णासाहेब डांगे कॉलेज यांनी सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

बिगर व्यावसायिक गटात कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजच्या विवेक या नियतकालिकास तर व्यावसायिक गटात सांगली जिल्ह्यातील वाळवा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या ज्ञानदा या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकावला. बिगर व्यावसायिक गटात विटा येथील बळवंत कॉलेजच्या बळवंत या नियतकालिकाने द्वितीय तर वारणानगरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वारणा या नियतकालिकाने तृतीय क्रमांक पटकावला. व्यावसायिक गटात अतिग्रे येथील संजय घोडावत इन्स्टिट्यूशनच्या उमंग या नियतकालिकाने द्वितीय तर इचलकरंजीच्या डीकेटीई संचलित वस्त्रोद्योग व अभियांत्रिकी कॉलेजच्या अंबर या नियतकालिकाने तृतीय क्रमांक मिळवला. प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते फिरते चषक देऊन गौरवण्यात आले. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सुशांत पाटील, डॉ. सर्जेराव जाधव यांनी पारितोषिकाचा स्वीकार केला. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले.



शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेतील विजेत्या महाविद्यालय व विद्यार्थ्यांसमवेत प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील आदी.